**<u>एस.सी.सी.क्र.५६२/२०११</u>**

<u>निशाणी क्र. २१</u>

**<u>फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१</u>–**

मी शपथेवर सांगतो की,

| | | |
|---|---|---|
| नांव | – | सतिश दिगंबर पाटील |
| वय | – | ४८ वर्षे |
| व्यवसाय | – | मॅनेजर |
| राहणार | – | प्राधीकरण, निगडी, जि. पुणे |

---------

**<u>सरतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अधिवक्ता श्रीमती ए. एस. चव्हाण यांच्या वतीने</u> –**

१. दि.०२/०६/२०११ रोजी मी हुंडाई कंस्ट्रक्शन इक्वीपमेंट मध्ये प्रोडक्शन इंजिनीयर म्हणुन काम करत होतो. आमच्या कंपनीमध्ये जेसीबी चे मॅन्युफॅक्चरींगचे काम होते. त्यावेळी माझे हाताखाली पन्नास माणसे काम करत होते. त्यावेळी माझे सोबत सचिन महाजन नावाचे सहकारी होते. मी सकाळी ७.०० वाजता कामाच्या जागी गेल्यानंतर मी माझ्या हाताखाली असलेल्या माणसांना त्यांची कामे वाटुन देत असे.

२. दि.०२/०६/२०११ रोजी माझी सकाळी पहिली शिफ्ट होती. त्या दिवशी मी दुपारी समाधान पाटील यास आर्मला रेनफोर्समेंट एक पार्ट लावण्यासाठी सांगितले. त्यानंतर मी ऑफीसमध्ये पुढील आठवडयाची शिफ्ट शेडयुल बनवण्यासाठी गेलो होतो. त्यानंतर मला ऑफीसमध्ये सचिन महाजन यांचा फोन आला. समाधान हा आमच्या कंपनीमध्ये फोरक्लीप ड्रायव्हर होता. त्यावेळेस त्याने मला फोनवर सांगितले की, कंपनीमध्ये समाधान याने फोरक्लीप फिनीशींग झालेला बुम बाहेर हलवत असतांना त्याचा दुस–या जॉबला धक्का लागुन तो जॉब संदीपच्या अंगावर पडला. त्यानंतर संदीपचा ओरडण्याचा आवाज आल्यामुळे बाकीचे कामगारांनी जॉब उचलला व तत्काळ संदीपला दवाखान्यात घेवुन गेले. संदीपच्या पाठीवर जॉब पडला असल्यामुळे त्याला मार लागला होता. संदीपचे त्यावेळी वय २५ ते २६ वर्ष होते.

३. घटनेच्या वेळी गोविंद व चव्हाण यांनी संदीपच्या पाठीवरुन जॉब उचलला. संदीपला पवना हॉस्पीटलमध्ये घेवुन गेले होते. तेथुन त्याला बिरला हॉस्पीटल, चिंचवड येथे घेवुन गेले. तेथे संदिप हा मयत झाला असे डॉक्टरांनी सांगितले. मी समाधान झनक आरोपीस पाहिल्यास ओळखु शकतो. आज रोजी समाधान हा न्यायालयात हजर नाही. आरोपीचा हजेरी माफीचा अर्ज <u>**निशाणी क्र. २०**</u> वर मंजुर करण्यात आला. मला जॉबचे फोटो दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला अभिलेखावर दाखल असलेली फोरक्लीपचा फोटो दाखवण्यात आला. ते तेच असुन ते होंडाई कंपनीचे आहे. त्यास <u>**आर्टीकल अ**</u> देण्यात येते. आता मला अभिलेखावर दाखल असलेला जॉबचा फोटो दाखवण्यात आला. ते तेच असुन त्यास <u>**आर्टीकल ब**</u> देण्यात येते. आता मला अभिलेखावर दाखल असलेल्या बुमचा फोटो दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यास <u>**आर्टीकल क**</u> देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

<u>**मध्यंतराची वेळ संपल्यामुळे उलटतपास काही काळापर्यंत तहकुब.**</u>

<u>**मध्यंतरानंतर पुढील उलटतपास आरोपींतर्फे अधिवक्ता श्री. इंगळे यांचे मार्फत –**</u>

४. हे म्हणणे खरे आहे की, सदरची घडलेली घटना ही मला ऐकीव माहिती मार्फत मिळालेली घटना आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांना दिलेल्या जबाबामध्ये मी शिफ्ट शेडयुल बनवायला गेलो हा मजकुर लिहीलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांना दिलेल्या जबाबामध्ये गोविंद आणि चव्हाण हे घटनास्थळी हजर होते हा मजकुर लिहीलेला नाही.

**प्रश्न –** सदर घटनेमध्ये चालक नामे समाधान झनक याची कसल्याही प्रकारची चुक होती की नव्हती ?

**उत्तर –** पुढचा जॉब उचलत असतांना त्याला पाठीमागचा जॉब दिसला नसेल म्हणुन त्या जॉबला धक्का लागला असेल.

हे म्हणणे खरे नाही की, मी दिलेला जबाब हा संपुर्ण खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष दिली आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

दिनांक – ०३/०१/२०२६

श्रवणोत्तर स्वीकृत

SNEHA VENKATRAO UTKAR

Digitally signed by SNEHA VENKATRAO UTKAR
Date: 2026.01.03 17:19:22 +0530

( एस. व्ही. उतकर )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. ३, खेड – राजगुरुनगर